**नि. फौ. खटला क्र.३३/२०२५**

**निशाणी क्र.३२**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | : | शेख ईस्माईल नबीसाब, |
| **वय** | : | ३५ वर्षे, **धंदा** : मजुरी, |
| **राहणार** | : | वलांडी, ता. देवणी, जि. लातूर. |

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. कुलकर्णी यांचेमार्फत ::**

दि.२६/०२/२०२५ रोजी पोलिसांनी मला पंचनाम्याकरिता बोलावले नव्हते. पोलिसांनी सदर दिवशी वलांडी येथे जमादारच्या घरासमोर मी जेवण करायला जात असताना मला बोलावले, माझी सही घेतली आणि छायाचित्र काढले. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. परंतु त्यामधील मजकूर मला माहीत नाही. सदर सहीला नि.३३ देण्यात येते.

०२. **साक्षीदार पूर्वीच्या कृतीवर कायम नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरून साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.**

०३. दि.२६/०२/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता वलांडी येथे पोलिसांनी मला बोलावले, फिर्यादीने घटनास्थळ दाखविले, ते मुख्य बाजारपेठेमधील होते व माझ्यासमक्ष पंचनामा लिहिला असे घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला व मी त्यानंतर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना मदत करण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखतो.

सरतपास पूर्ण.

:: **<u>आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.एस. नागराळे यांनी नाकारला</u>** ::

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत                सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि.२७/०३/२०२६.